# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १२७ वा गुरूवार दि.२४ ऑक्टोंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## निवडणूक विषयक पथकांनी सतर्क राहून कामकाज करावे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

### जिल्हास्तरीय निवडणूक पथक प्रमुखांची बैठक






लातूर, दि. २३ : विधानसभा निवडणुकीसाठी गठीत करण्यात आलेल्या सर्व पथकांनी सतर्क राहून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडावी. यामध्ये कोणत्याही प्रकारे दिरंगाई अथवा हलगर्जीपणा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित निवडणूक पथक प्रमुखांच्या बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे, जिल्हा कोषागार अधिकारी उज्ज्वला पाटील, शिक्षणाधिकारी तथा स्वीपचे नोडल अधिकारी नागेश मापारी, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक केशव राऊत यांच्यासह विविध निवडणूक पथकांचे नोडल अधिकारी, विविध समितींचे सदस्य यावेळी उपस्थित होते. स्वीप समिती, प्रसारमाध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती, इन्फोर्समेंट समिती, कॅश रिलीज कमिटी आदी विविध समितींचा आढावा यावेळी घेण्यात आला. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर विविध पथके गठीत करण्यात आली आहे. या सर्व पथकांनी परस्परांशी समन्वय ठेवून आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडावी. आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी, निवडणूक खर्च संनियंत्रण करण्यासाठी स्थापन केलेल्या पथकांनी अधिक दक्ष राहून कामकाज करावे. रोख रक्कम अथवा अवैध दारू, अंमली पदार्थ जप्तीची कार्यवाही केल्यास प्रत्येक बाबीची बारकाईने नोंद घेवून अहवाल सादर करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. स्वीप कक्षामार्फत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबवून मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. एमसीएमसी समितीने राजकीय जाहिरात प्रमाणीकरण, पेड न्यूज आदी बाबींवर बारकाईने लक्ष ठेवावे. रोख रक्कम वाहतूक किंवा मतदारांना आमिष दाखविण्याचे प्रकार आढळून आल्यास त्वरित कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल ऑनलाईन पोर्टलवर सादर करावा, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. कदम यांनी प्रारंभी सर्व समिती, कक्षांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीबाबत माहिती दिली.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलला दिली भेट



लातूर (प्रतिनीधी) : बुधवार दि. २३ ऑक्टोबर २४ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. २३ ऑक्टोबर रोजी दुपारी लातूर शहरातील एमआयडीसी परिसरातील विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूरच्या विवेकानंद कॅन्सर अँड सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलला भेट देऊन पॅथॉलॉजी कक्ष क्ष कीरन कक्ष, लिनिअर अक्सिलेटर कक्ष, शस्त्रक्रियागृह संकुल व विवेकानंद रुग्णसेवा सदन येथील सभागृह भोजन कक्ष, सामूहिक महिला कक्ष, सहनिवास क,क्ष विशेष निवास कक्ष, आदीची पाहणी करून अत्याधुनिक वैद्यकीय सोयीसुविधा आपल्या भागात विवेकानंद रुग्णालयाने उपलब्ध केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. या दरम्यान विवेकानंद मेडिकल फाउंडेशन अँड रिसर्च सेंटरचे संस्थापक अध्यक्ष पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे यांच्याशी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी सध्याच्या वैद्यकीय सोयीसुविधा त्या समोरील अडचणी सामाजिक प्रश्न आदी विविध विषयावर त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी विवेकानंद कॅन्सर अँड सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलचे डॉ.ब्रिजमोहन झंवर, डॉ.प्रमोद टिके, डॉ. बाजीराव जाधव, डॉ. निखिल घड्याळ, डॉ. पाटील, डॉ. अर्जुन मंदाडे, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. वेदप्रकाश माकणीकर, डॉ.आरती झंवर, अनिल जवळेकर रुग्णालयाचे अधिकारी कर्मचारी, रुग्ण, नातेवाईक उपस्थित होते.

## भाजप आणि विविध पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

### 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज देशमुख यांनी केले सर्वांचे पक्षात स्वागत



लातूर/प्रतिनिधी :- लातूर ग्रामीण मतदारसंघातील पोहरेगाव येथील कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी सर्वांचे पक्षात स्वागत करून सर्वांना पक्षकार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री सर्जेराव मोरे, श्री लालासाहेब चव्हाण, रेणापूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष श्री प्रमोद जाधव, रेणापूर बाजार समितीचे उपसभापती श्री शेषराव हाके पाटील, श्री गंगासिंह कदम, संतोष देशमुख, सुभाष घोडके आदीसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

दरम्यान भिसे वाघोली (ता. लातूर) येथील भाजपचे सोशल मीडिया समन्वयक श्री समाधान भिसे पाटील, जेवळी (ता. लातूर) सोसायटीचे चेअरमन श्री महेश अशोक नरवडे, उमाकांत दरकसे यांच्यासह अतुल भिसे , कल्याण भिसे , बालाजी भिसे , गोविंद भिसे , गणेश भिसे , पवन भिसे , ऋषिकेश गोगावकर , मुकिंदा मांदळे , विकास मांदळे , संगम मांदळे , प्रकाश मांदळे , मल्हारी मांदळे , अमित मांदळे , दिलीप मांदळे , अक्षय आदमाने , क्रांती पाटील , ज्ञानेश्वर गुंड , संतोष मांदळे , बाबासाहेब आदमाने , समीर सय्यद , संदीप मांदळे , नामदेव मांदळे , बल्लाळनाथ मांदळे आदींनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांचेही लातूर ग्रामीणचे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी पक्षात स्वागत केले. यावेळी रविंद्र काळे , मदन भिसे , प्रवीण सूर्यवंशी , अजित काळदाते , धनंजय वैद्य , निखिलेश पाटील अनिल दरकसे , भागवत दरकसे , रामकिशन रणदिवे , मिठू दरकसे , अमर मोरे , दयानंद बिडवे रणजित पाटील , दौलत कदम , अमोल भिसे , गोविंद वाघमारे , नागेश लाळगे , महेंद्र मुळे , प्रताप उफाडे , अशोक उपाडे भरत उपाडे राम पाटील रामकृष्ण उफाडे गजानन पाटील युवराज पाटील बाबासाहेब शिंदे आदी उपस्थित होते .

आमदार धिरज देशमुख म्हणाले, काँग्रेस पक्षात सर्वांचे स्वागत आहे. आपल्या भागातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी आणि आपल्या भागात अपेक्षित विकास करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने आणि एकदिलाने काम करावे. प्रत्येक घटकाला सोबत घेऊन समाजाचे प्रश्न मार्गी लावावे. काँग्रेस पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी कामाला लागावे.

## मविआचं ठरलं, महायुतीचे ठरेना

मुंबई : प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मध्यस्थीनंतर अखेर महाविकास आघाडीतील जागावाटपाची कोंडी फुटली असून २७० जागांवर एकमत झाले आहे. आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (श. प.) हे तिन्ही पक्ष प्रत्येकी ८५-८५-८५ जागा लढवणार आहेत. उर्वरित जागांबाबत अन्य मित्र पक्षांशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार आहे. दुसरीकडे महायुतीतील जागावाटपाचा तिढा कायम असला तरी तिन्ही पक्षांनी मिळून १८२ उमेदवार जाहीर केले आहेत. काही जागांबाबत अजूनही पेच असून त्यावर तोडगा काढण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी दिल्ली गाठली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात होऊन २ दिवस उलटले तरी महायुती आणि महाविकास आघाडीतील कोणता पक्ष किती जागा लढवणार, याचा गुंता सुटत नव्हता. जागावाटपाच्या चर्चे चे गु-हाळ संपायला तयार नव्हते. महाविकास आघाडीच्या जागावाटपाची स्थिती 'हत्ती गेला आणि शेपूट अडकले', अशी झाली होती. काल रात्री तब्बल साडेपाच तास व आज तीन तास बैठक होऊनही एकमत होत नव्हते. अखेर आघाडीच्या नेत्यांनी शरद पवारांकडे धाव घेतली. काँग्रेस नेते नाना पटोले, बाळासाहेब थोरात, शिवसेनेचे संजय राऊत आणि अनिल देसाई, राष्ट्रवादीचे जयंत पाटील आणि अनिल देशमुख यांची शरद पवारांसोबत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे बैठक झाली.

## निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी गठीत पथकांचा निवडणूक निरीक्षकांनी घेतला आढावा

लातूर, दि. २३ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांसाठी जयप्रकाश उपाध्ये व डॉ.रामसिंह गुर्जर या दोन निवडणूक खर्च निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. या दोन्ही निवडणूक निरीक्षकांनी आज जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी गठीत केलेल्या पथकांच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच अनुषंगिक सूचना दिल्या. तसेच खर्च विषयक बाबींवर बारकाईने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके यांच्यासह विविध पथकांचे नोडल अधिकारी यावेळी उपस्थित होते. लातूर जिल्ह्यातील सहाही मतदारसंघात निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी भरारी पथके, व्हिडीओ सर्व्हीलंस टीम, चेकपोस्ट स्थापन करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून प्रचार सभा, प्रचारासाठी वाहनांचा वापर यावर होणारा खर्च याचे संनियंत्रण केले जात आहे. या सर्व पथकांनी आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी, अशा सूचना निवडणूक खर्च निरीक्षक जयप्रकाश उपाध्ये व डॉ.रामसिंह गुर्जर यांनी उपस्थितांना दिल्या. तसेच उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची नोंदवही भरण्याबाबत उमेदवार प्रतिनिधींना सूचना द्याव्यात, असे त्यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी निवडणूक खर्च संनियंत्रणासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने माहिती दिली.




## विनोद खटके आज पदयात्रा काढून समर्थकांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करणार

### मतदार वंचित बहुजन आघाडीकडे समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत : विनोद खटके



लातूर : लातूरचे मतदार स्थानिक आमदारांना कंटाळले असून ते वंचित बहुजन आघाडीकडे एक समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत, असे प्रतिपादन लातूर शहर विधानसभा मतदार संघाचे वंचितचे अधिकृत उमेदवार विनोद खटके यांनी बुधवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना केले. आपण मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी पदयात्रा काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी लातूर शहर विधानसभेसाठी व्ही.एस. पँथरचे संस्थापक अध्यापक अध्यक्ष विनोद खटके यांना उमेदवारी घोषित केल्यापासून लातूरमधील युवकात जणू नवचैतन्य संचारले आहे. विनोद खटके आपला उमेदवारी अर्ज गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर २०२४ रोजी दाखल करणार आहेत. त्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना उमेदवार विनोद खटके म्हणाले की, गुरुवारी सकाळी आपण वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख नेते आणि आपल्या व्ही.एस. पँथरच्या पदाधिकारी - समर्थकांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून पदयात्रेने शहरातील प्रमुख मार्गाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कवर येणार आहोत. डॉ. आंबेडकर पार्कवर भव्य जाहीर सभा होईल. तेथूनच आपण आपला उमेदवारी अर्ज दाखल करायला जाणार असून अर्ज दाखल केल्यानंतर पुन्हा जाहीर सभेत सहभागी होणार आहोत. अर्ज दाखल करायला गेल्यानंतरही सभा चालूच राहणार आहे. आपल्या पक्षाचे नेते त्यावेळी सभेला संबोधित करतील, असे त्यांनी सांगितले.

आपली उमेदवारी ही विजयसाठीची उमेदवारी आहे. प्रत्येकाला राजकीय महत्वाकांक्षा असते, नव्हे असलीच पाहिजे,असे सांगून विनोद खटके पुढे म्हणाले की, मागच्या अनेक काळापासून लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न प्रलंबित आहे. त्यासाठी लातूरच्या माझं लातूर परिवाराने सर्वतोपरी प्रयत्न केले. विविध आंदोलने केली, तरीही हा प्रश्न अद्याप सुटला नाही. दलित - मुस्लिम समाज सर्वाधिक संख्येने या रुग्णालयाचा लाभ घेत आला आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी आपण प्राधान्याने प्रयत्नशील राहू. लातूरच्या एमआयडीसीमध्ये आतापर्यंत एकही मोठा प्रकल्प आणला गेला नाही. आपण त्यासाठीही प्रयत्नरत राहणार आहोत. लातूरमध्ये मुबलक पाणी आहे. फक्त त्याचा विनियोग व्यवस्थित होत नाही. उपलब्ध असलेले पाणी नेमके कुठे मुरते ? या प्रश्नाची सोडवणूक आपण नक्कीच करू. अशा अनेक प्रलंबित प्रश्नांमुळेच मतदार आता वंचित आघाडीकडे समर्थ पर्याय म्हणून पाहत आहेत.

भारतीय राज्यघटना कोणीही बदलू शकत नाही. वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांची मते विभागण्याचा प्रयत्न सगळ्यांकडून होतोय. त्यांनी लोकसभा निवडणुकीवेळी मांडलेले सर्व आडाखे वास्तवात उतरले आहेत, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. या निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मी अनेकांना भेटलो आहे. मला गरिबीची जाण आहे. माझी गोरगरीब मतदारांशी नाळ जुळली आहे, असेही विनोद खटके यांनी सांगितले. याप्रसंगी वंचितचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी, रमेश गायकवाड, जिल्हा महासचिव ॲड. रुपेश सोमवंशी, सौफिभाई सय्यद, व्ही.एस. पँथरचे अमोल सुरवसे, आनंद जाधव, पंकज शिंदे, संदीप बानाटे , नितेश पटसाळे, सिद्धांत चिकटे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## संपादकीय....

### ‘संयुक्त राष्ट्रा’ची उपयुक्तता?

संयुक्त राष्ट्राने सामाजिक व राजकीय पातळीवर यशस्वी काम केले असले तरीही हे संयुक्त राष्ट्राचे निर्भेळ यश नक्कीच नाही. राष्ट्रसंघाप्रमाणेच संयुक्त राष्ट्र संघटनासुद्धा महासत्तांच्या बाबतीत अपयशीच ठरली आहे. दुसर्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि पुन्हा असे महाभयंकर युद्ध होऊ नये यासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्राच्या यशापयशावर जगात अनेकदा चर्चा आणि विचारमंथन झाले आहे; परंतु गेल्या दोन वर्षांत जागतिक राजकारणात विशेषत: मध्यपूर्वेकडील राजकारणात जे काही सुरू आहे ते पाहता संयुक्त राष्ट्राच्या उपयुक्ततेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. हमासच्या राजनैतिक दलाचे प्रमुख याह्या सिनवार यांच्या इस्रायलकडून केलेल्या हत्येनंतर संपूर्ण मध्यपूर्वेचे राजकारण ढवळून निघाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेचा दबाव आणि कुटनीतीमुळे मध्यपूर्वेतील राजकीय घडामोडींपासून स्वत:ला दूर ठेवण्याचा प्रयत्न करणारी इस्लामिक राष्ट्रे इस्रायल–हमास युद्धामुळे हळूहळू जवळ येऊ लागली आहेत. तुर्कीएचे परराष्ट्रमंत्री हकन फिदान यांनी याह्या सिनवार यांची हत्या ही तिसर्या महायुद्धाची सुरुवात असू शकते, असे विधान केल्यामुळे या विषयाला अधिक गांभीर्य प्राप्त झालेच पण त्यामुळे संयुक्त राष्ट्राच्या उपयुक्ततेवरसुद्धा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, युक्रेनवरील रशियाचे आक्रमण, गाझा पट्टीतील इस्रायलचे हल्ले रोखण्याचा संयुक्त राष्ट्रे सपशेल अपयशी ठरल्याने संयुक्त राष्ट्राची उपयुक्तता आता संपुष्टात आली आहे. पहिल्या महायुद्धानंतर झालेली प्रचंड आर्थिक व जीवितहानी पाहून इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांसारख्या विजेत्या राष्ट्रांनी राष्ट्रसंघाची स्थापना जागतिक शांततेच्या दृष्टीने केली होती. परंतु, संस्थापक राष्ट्रांच्या वसाहतवादी इर्षेला चाप लावण्यात राष्ट्रसंघ सपशेल अपयशी ठरला व त्यातूनच दुसर्या महायुद्धाचा भडका उडाला. दुसर्या महायुद्धाच्या निर्णायक क्षणी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अनुक्रमे ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी लिटलबॉय व फॅटमन हे दोन अणुबॉम्ब टाकून जपानला युद्धातून माघार घेण्यास भाग पाडले. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया, पोलंड यांच्या दोस्त राष्ट्रांच्या गटाने हे महायुद्ध जिंकले असले तरीही या युद्धात झालेली प्राणहानी व वित्तहानी पहिल्या महायुद्धापेक्षा कितीतरी महाभयंकर व भयावह होती. अमेरिकेच्या अणुबॉम्बने महायुद्धात जो हाहाकार माजविला त्याने एक गोष्ट स्पष्ट झाली ती म्हणजे जर तिसरे महायुद्ध झाले तर या पृथ्वीचा शेवट नक्की आहे. महायुद्धासारखे भयावह युद्ध पुन्हा होऊ नये म्हणून एका सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय संघटनेची गरज लक्षात घेऊन अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष फ्रँकलिन रुझवेल्ट यांनी संयुक्त राष्ट्रे (युनायटेड नेशन्स) ही संकल्पना जगासमोर मांडली. २४ ऑक्टोबर १९४५ रोजी ५१ राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेच्या सनदेवर स्वाक्षरी केली आणि संयुक्त राष्ट्राची स्थापना झाली.

संयुक्त राष्ट्राची चार उद्दिष्टे

१) जगभर शांतता प्रस्थापित करणे.

२) राष्ट्रा–राष्ट्रांमध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण करणे.

३) गरिबांचे आयुष्य सुधारणे, उपासमारी नष्ट करणे, आजार व निरक्षरता दूर करणे, मानवी हक्कांचा व स्वातंत्र्याचा आदर करणे यासाठी सदस्य राष्ट्रांना मदत करणे.

४) वरील ध्येय्य प्राप्तीसाठी विविध राष्ट्रांच्या कार्यात मध्यावधी भूमिका निभावणे.

संयुक्त राष्ट्राचे सध्या भारतासह जगभरातील १९३ राष्ट्रे सदस्य असून त्याचे मुख्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरात आहे. भारत हा संयुक्त राष्ट्र संघटनेचा संस्थापक सदस्य असून संयुक्त राष्ट्राच्या अनेक कार्यात हिरीरीने सहभाग घेत असतो. संयुक्त राष्ट्राचे यश आणि अपयश आज जागतिक पातळीवर जगातील अनेक राष्ट्रांचे आपल्या शेजारील राष्ट्रांबरोबर सीमेवरून वाद आहेत. अनेक वेळा युद्धप्रसंगही उद्भवल्याची उदाहरणे आहेत. उत्तर कोरिया–दक्षिण कोरिया युद्ध, चीन–व्हिएतनाम युद्ध, १९४७ चे भारत–पाकिस्तान युद्ध यांसारख्या अनेक युद्ध प्रसंगात संयुक्त राष्ट्रसंघाने यशस्वी तडजोड केलेली आहे. युगांडा, झिम्बाब्वे, लिबिया यांसारख्या आफ्रिकेतील देशांमध्ये आलेल्या अंतर्गत अशांततेचे वेळीसुद्धा संयुक्त राष्ट्राने निर्णायक भूमिका बजावली आहे. शिक्षण व प्रगतीपासून वंचित असलेल्या राष्ट्रांमध्ये विशेष करून आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील देशांमध्ये शिक्षण व आरोग्याचा प्रचार व प्रसार संयुक्त राष्ट्राकडून सुरू आहे. पर्यावरण, व्यापार, वेठबिगारी, महिला व बाल अत्याचार, सामाजिक व आर्थिक सुरक्षा अशा अनेक पातळीवर संयुक्त राष्ट्रे काम करताना दिसत आहेत. संयुक्त राष्ट्राचे कामकाज सदस्य राष्ट्रांकडून मिळणार्या निधीवर (वर्गणी) चालत असते; त्यामुळे श्रीमंत राष्ट्रे वेळोवेळी संयुक्त राष्ट्राला आपल्या मुठीत घेण्याचा प्रयत्न करित असतात. अमेरिकेने ‘नाटो’च्या मदतीने इराकवर केलेली लष्करी कारवाई हा आजही वादाचा विषय आहे. या कारवाईला संयुक्त राष्ट्राचा विरोध असतानासुद्धा हा विरोध डावलून अमेरिकेने कारवाई केली. कारण संयुक्त राष्ट्राला सर्वात जास्त निधी अमेरिकेकडून दिला जातो. दुसर्या महायुद्धानंतर अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, उत्तर कोरिया, इस्रायल व चीन यांसारख्या राष्ट्रांमध्ये अण्वस्त्रे निर्माण करण्याची स्पर्धा लागली ती संयुक्त राष्ट्राला थांबविता आली नाही. शीतयुद्धाच्या काळात उद्भवलेलल्या पेचप्रसंगांना तसेच महासत्तांनी प्रतिबंध करण्यास संयुक्त राष्ट्रे दुबळी ठरली. संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स, चीन हे ५ कायमस्वरूपी स्थायी सदस्य आहेत. त्यामुळे आपल्या व आपल्या मित्र राष्ट्रांच्या विरोधात आलेल्या प्रस्तावाविरोधात मिळालेल्या विशेष नकाराधिकाराचा (गैर)वापर करून ही राष्ट्रे संयुक्त राष्ट्राचे कामकाज प्रभावित करीत असतात. प्रमुख राष्ट्रांच्या या अनिर्बंध मनमानीवर चाप लावण्यास संयुक्त राष्ट्रे अयशस्वी ठरली आहे.

# वर्तुळाकार विकास


पुण्यातील वाढती वाहतूक समस्या आणि नागरी सुविधांचा अभाव यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. त्यावर काय उपाययोजना करायची यावर पुण्यात अधूनमधून नेहमी चर्चा चालते. प्रसारमाध्यमांमध्येही हा विषय बर्याच वेळा लावून धरला जातो, पण यातील कुठलीच समस्या कमी होताना दिसत नाही, उलट त्या दिवसेंदिवस जटील होताना दिसत आहेत. या सगळ्यावर उपाय म्हणून पुण्याच्या भोवती वर्तुळाकार रिंगरोड आखून त्या परिसरातील ११७ गावांचा सुनियोजित विकास करण्याचा निर्णय झाला आहे. नगर विकास विभागाने त्यासाठी १० ऑक्टोबर रोजी अधिसूचना जारी केली आहे. हा रिंगरोड १७२ किलोमीटरचा आणि ११२ मीटर रुंदीचा आहे. त्यामध्ये हवेली, वेल्हा, पुरंदर, भोर आदी तालुक्यांतील ११७ गावे येतात. ही सगळी गावे विशेष नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडे देण्यात आली आहेत. हा सगळा परिसर ६६८ चौरस किलोमीटरचा आहे. या क्षेत्रफळाचे विशेष नियोजन करण्यासाठी एक नियोजन प्राधिकरणही नियुक्त करण्यात आले आहे. व्यापक दृष्टीने आणि दीर्घकाळच्या हितासाठी हा अत्यंत योग्य निर्णय असून त्याचे स्वागतच केले पाहिजे. मध्य पुण्यात आता वाढीला जागा उरलेली नाही.

रस्ते, पाणी, आरोग्य अशा सुविधा पुरवण्यातही मर्यादा येत आहेत. त्यामुळे पुण्यातली गर्दी पांगवण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल असे वाटते. फक्त मुद्दा एवढाच आहे की हा आराखडा केवळ कागदावर राहता कामा नये आणि निधीअभावी तो वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवता कामा नये. अन्यथा सरकारी नियोजनाचे स्वरूप देखणे असते, त्यातून लोकांना कागदोपत्री दिलासा मिळतो; पण प्रत्यक्षात मात्र त्या गतीने काम होताना दिसत नाही. मध्य पुण्यात बहुतांश ठिकाणी पाच ते सात एफएसआय मिळण्यास वाव आहे त्यातून मध्य पुण्यातील जुन्या इमारतींचा पुनर्विकास व्यापक स्तरावर सुरू आहे आणि त्या ठिकाणी आता २२ ते २३ मजली टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत.

अशा अनेक इमारतींना मध्य पुण्यात परवानगी मिळाली आहे आणि त्यातील काही पूर्णत्वासही गेल्या आहेत. त्यातून लोकांच्या राहण्याची सोय होईल ही गोष्ट खरी आहे, पण मुद्दा असा आहे की एकाच इमारतीत इतक्या मोठ्या संख्येने राहायला येणार्या रहिवाशांना पुरेशा दाबाने पिण्याचे पाणी पुरवणे, त्यांना अन्य नागरी सुविधा पुरवणे तसेच त्यांच्या वाहतुकीची कोंडी होणार नाही याची काळजी घेणे हे महत्त्वाचे आहे. पण पुण्यातले रस्ते आहेत तेवढेच आहेत, ते या वाढत्या रहिवासी संख्येला पुरे पडणारे नाहीत. रस्त्याच्या कडेला बहुमजली टोलेजंग टॉवर उभे राहात असल्याने पुण्याचा व्हर्टिकल विकास मोठ्या प्रमाणावर होत असला, तरी हॉरिझोंटल विकासाला गती देणे आवश्यक होते, या वर्तुळाकार रिंगरोडच्या माध्यमातून हा हॉरिझोंटल विकास उदयाला येऊ शकतो.

पुण्यातली वाहतूककोंडी हा केवळ चर्चेपुरताच मर्यादित विषय असतो. कारण त्यात इच्छा असूनही रस्त्यांसाठी जागाच अपुरी असल्याने मार्ग निघणे अवघड असते. बहुमजली उड्डाणपूल हा त्याला पर्याय असला तरी त्याच्याही काही मर्यादा आहेत. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चौफेर वाढत चाललेल्या पुण्याला योग्य प्रमाणात पाणीपुरवठा करणे हीसुद्धा एक मोठी समस्या आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील गर्दी विखुरणे गरजेचे होते. त्यासाठी शहरालगत असलेल्या या ११७ गावांमध्ये जर पुरेशा नागरी सुविधा उपलब्ध झाल्या आणि तेथे सुनियोजित विकास झाला तर लोक या गावांचा पर्याय स्वीकारू शकतील.

मध्य पुण्यात आणि आसपासच्या भागात जादाचा एफएसआय देणे बंद करा, अशी मागणी बरेच नगररचनाकार करीत आहेत. त्या पर्यायाचाही आता विचार करावा लागेल. कारण, विनाकारण दिला जाणारा वाढीव एफएसआय हा वाढीव नागरी समस्यांनाच कारणीभूत ठरणार आहे याची जाणीव प्रशासन स्तरावर व्हायला हवी. प्रशासनाने रिंगरोडच्या कडेने नव्या वसाहती व टाउनशिप निर्माण करून पुण्यातली गर्दी कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घ्यावी हा दुसरा पर्याय सुचवला गेला होता त्यावर आता निर्णय झाला आहे. या ११७ गावांमध्ये दोन आर्थिक विकास केंद्रेही स्थापन केली जाणार आहेत असे संबंधित बातमीत म्हटले आहे. मात्र, या आर्थिक विकास केंद्रांचा तपशील जाहीर झालेला नाही.




त्यांचे नेमके उद्दिष्ट स्पष्ट झालेले नाही, त्याचाही उलगडा प्रशासनाकडून लवकर होणे गरजेचे आहे. आर्थिक विकास क्षेत्र म्हणजे स्पेशल इकॉनॉमिक झोन काय आहे हे पण समजायला हवे. हा निर्णय घेऊन सरकारने पुण्याच्या बाबतीत आम्ही गंभीर आहोत हे सिद्ध केले आहे ही एक चांगली बाब झाली. ११७ गावे सुनियोजितपणे विकसित करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण स्थापन केले गेले आहे ती बाबही कौतुकास्पद आहे. पण हे प्राधिकरण याआधी नेमलेल्या पीएमआरडीए पेक्षा वेगळे आहे काय याचाही खुलासा होणे गरजेचे आहे. पीएमआरडीए अस्तित्वात येऊन बराच कालावधी झाला आहे पण त्याचा कारभारही अत्यंत कासवगतीने सुरू आहे. त्या कार्यालाही गती देण्याची आता गरज आहे.

एमएमआरडीएमार्फत मुंबईचा सुनियोजित आणि वेगवान विकास झाला तसाच विकास पीएमआरडीएमार्फत पुणे परिसरात अपेक्षित होता. या पुढील काळात याकडे कटाक्षाने लक्ष देण्यासाठी पुण्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यंत्रणा एकमेकाला सहकार्य करीत, पुण्याला जो विविध समस्यांचा वेढा पडला आहे त्यातून नागरिकांची सुटका करतील अशी अपेक्षा आहे. पूर्व पुण्यासाठी वेगळी महापालिका स्थापन करावी अशी ही बर्याच दिवसांपासूनची मागणी आहे. पुणे महानगरपालिकेची हद्दवाढ खूप झाली आहे, तेथील विकासकामे महापालिकेच्या आवाक्याबाहेरची आहेत. त्यामुळे नवीन महापालिका स्थापन करून प्रशासनाचे विकेंद्रीकरण केल्यास उपनगरातील रहिवाशांनाही चांगला दिलासा मिळू शकतो, त्याचाही आता सरकारने प्राधान्याने विचार करण्याची गरज आहे.

# वंचित वाणी,आरक्षणाची हमी

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींमधील उप–वर्गीकरणाकडे वाटचाल, जरी हेतूपूर्वक असली तरी, सामाजिक न्यायाच्या व्यापक उद्दिष्टाला क्षीण करू शकणारे महत्त्वपूर्ण धोके आहेत. संविधान सभेतील वादविवाद, न्यायिक उदाहरणे आणि व्यावहारिक विचार या सर्व गोष्टी या समुदायांच्या विघटनाच्या धोक्याकडे निर्देश करतात. सामुहिक उत्थानावर आणि संपूर्णपणे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना प्रभावित करणाऱ्या प्रणालीगत भेदभावावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.अनुसूचित जाती आणि जमाती मध्ये उपवर्गीकरण लागू करण्यासंबंधी १ऑगस्ट–२०२४ रोजीचा सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय भारतीय संविधान अनुच्छेद–३३८ नुसार झालेले नसून अनुसूचित जाती आयोगाच्या अधिकाराचे हनन करून निकाल दिलेला आहे त्यामुळेच या निकालात राजकीय हस्तक्षेपाचा वास येत असल्याने सर्वोच्च न्यायालयाची विश्वासार्हतेवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेले आहे.

भारत सरकारच्या संविधानानुसार अनुच्छेद १६ (३), १६(४) व १६(४–क) च्या नुसार राज्यात नोकऱ्यामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सर्व पदासाठी व पदोन्नतीसाठी आरक्षण ठेवण्याचे विशेष अधिकार देण्यात आले.

खुल्या प्रभागात होणाऱ्या नोकर भरतीमध्ये अनुसूचित जातीसाठी १५% आरक्षण ठेवण्यात आले आहे. स्पर्धात्मक परीक्षा किंवा युपीएससीच्या होणाऱ्या भरतीमध्ये १६.२ % इतके आरक्षण ठेवण्यात आले आहे. ग्रुप सी अथवा ग्रुप डी प्रभागात होणाऱ्या नोकर भरती स्थानिक अथवा विभागीय आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यामुळेच हे आरक्षण अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती हयाच्या त्या राज्यात अथवा केंद्रशासित भागात असणाऱ्या प्रमाणात असते पण सरळसेवा भरतीला आरक्षण लागू असल्याचे कायदे करण्यात आले असले तरी आरक्षीत पदांना पदोन्नतीत आरक्षणाचा कायदा काँग्रेस आणि भाजपा सरकारने केला नाही त्यामुळे आरक्षित पदाची पदोन्नती कायदा न केल्याने पदोन्नती आरक्षण बंद करण्यात आले आहे पदोन्नती आरक्षणासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने विरोध केल्याने अद्याप कायदा तयार करण्यात आला नाही भारतीय संविधातील अनुच्छेद–१६

अनव्ये अनुसूचित जाती जमाती यांना आरक्षणा बाबत तरतूद करण्यात आली असली तरी या संरक्षक कायद्याची अमलबजावणी भारतीय संविधानातील अनुच्छेद–३३८अनव्ये अनुसूचित जाती जमाती आयोगाच्या कार्यकक्षेत येते अनुसूचित जाती–जमातीचे सेवेतील आरक्षण ही बाब आयोगाच्या कार्यकक्षेतील आहे. आयोगाच्या कार्यकक्षेतील बाबीवर सुप्रीम कोर्टाला निर्णय घेण्याचा अधिकार नाही.

आयोग या सर्व कामकाजाची माहिती आयोग मा.राष्ट्रपतीना सुपूर्द करतात व ज्या राज्यात अंमलबजावणी झाली नाही अशा राज्यात काय उपाय करता येतील याची उपाययोजना सुचवितात. याशिवाय अनुसूचित जातीच्या संरक्षणाच्या कल्याणाच्या व सामाजिक अर्थव्यवस्थेसंदर्भात सुचना देतात.ती माहिती संसदेच्या प्रत्येक सदनात ठेवली जाते. जर राज्य सरकारच्या बाबतीत ही गोष्ट असेल तर ती त्या राज्याच्या राज्यपालांना दिली जाते किंवा राज्य विधानसभेत सुध्दा ही माहिती दिली जाते.अनुसूचित जाती–जमाती आयोगाने जाती–जमाती याचे उपवर्गीकरण करावे किंवा नाही याबाबद किंवा अनुसूचित जाती–जमातीच्या उन्नत घटकांसाठी क्रिमिलियर अट लागू करणे बाबद संसदेत अहवाल सादर केला असता तर किंवा तशी शिफारस केली असती तर सुप्रीम कोर्टास निर्णय देता आला असता पण कोर्टाने सुमोटो निर्णय देऊन राष्ट्रपती यांच्या अधिकाराचे हनन केले आहे या बाबीकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

भारत निवडणूक आयोग, वित्त आयोग,राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग,अनुसूचित जाती आयोग,महालेखापरीक्षक,भारताचे ऍटर्नी जनरल,न्यायाधिकरण,भारताचे सर्वोच्च न्यायालय,राज्य लोकसेवा आयोग,राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग,वस्तू आणि सेवा कर परिषद,महानगर नियोजन समिती, जिल्हा नियोजन समिती,इत्यादींना भारतीय राज्यघटनेने आपले अधिकार घटनात्मक संस्थांना दिले आहेत.ते भारतीय संविधानात सूचीबद्ध आहेत आणि संविधान बदलल्याशिवाय रद्द किंवा बदलले जाऊ शकत नाहीत.सर्वोच्च न्यायालयात एखाद्या प्रकरणात या घटनात्मक संस्थांच्या अधिकारातील बाब समोर येईल त्यावेळी न्यायालय सुद्धा तो त्या घटनात्मक संस्थांच्या अधिकारात ढवळाढवळ करीत नाही.सुप्रीम कोर्ट सुध्दा राजकीय पक्षाच्या प्रकरणात निवडणूक चिन्ह आणि खरा राजकीय पक्ष कोणता या बाबदचा विषय येईल तेव्हा तो निवडणूक आयोगाच्या अधिकारातील बाब आहे म्हणून टिप्पणी करून मोकळे होतात.मग अनुसूचित जाती–जमाती आरक्षणात जाती–जमाती आयोग यांच्या अधिकारातील जातींतील उपवर्गीकरण आणि क्रिमिलियर लावण्याच्या अधीकारात ढवळाढवळ करून जाती–जमाती आयोगाच्या अधिकारांचे म्हणजेच,राष्ट्रपती,संसद यांचे अधिकार हनन करण्यात आले असले तरी कुणीही बोलण्यास तयार नाही म्हणजेच हा कट रचून आरक्षण रद्द करण्याचे पहिले पाऊल उचललेले आहे.असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाचे या निर्णयाचे काँग्रेस आणि भाजपा यांनी समर्थन केले आहे तर काहींकाही राज्यात उपवर्गीकनाचे व क्रिमिलियर लावण्याचे अधिकार घटना दुरूस्ती न करता राज्यांना बहाल करण्यात आल्याचे निर्णय दिल्याने उपवर्गीकरण आणि क्रिमिलियर अट लावण्यासाठी समित्या तयार करण्यात आल्या आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णया विरोधात देशातील अनुसूचित जाती–जमाती आंबेडकरवादी संघटना आक्रमक होऊन दि २१ऑगष्ट–२०२४ रोजी देशव्यापी बंद पुकारला होता तर बसपाच्या बहेन मायावती यांनी सदर घटनेवर तीव्र शब्दात निषेध नोंदवला होता तर वंचित बहुजन आघाडीने ही तीव्र प्रतिक्रिया देऊन या निर्णयाविरोधात अभियान उभं करून महाराष्ट्र विधानसभा–२०२४ आरक्षण मुद्यांवरच लढवण्याचे ठरवलेले आहे.देशातील अनुसूचित जातींच्या सर्वपक्षीय खासदारांच्या शिष्टमंडळ मा.प्रधानमंत्री नरेंद्र मोदींची भेट घेऊन नाराजी व्यक्त केली यावर अनुसूचित जाती–जमातींचे उप–वर्गीकरण न करण्याचे आश्वासन दिले मात्र तत्पूर्वीच सुप्रीम कोर्टाने उप–वर्गीकरणाचे अधिकार राज्य शासनास दिलेले आहेत.प्रधानमंत्री यांनी दिलेल्या अश्वासन म्हणजे,’पादं गेला निघून,अन टीर धरा आवळून’ असेच म्हणावे लागेल.अनेक आंबेडकरवादी संघटनांनी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाविरोधात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी आरक्षणातील उप–वर्गीकरणाशी संबंधित१ऑगस्ट २०२४ रोजी दिलेला निर्णय बदलण्यासाठी पुनर्विलोकन याचिका फेटाळल्या.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी आपल्या आदेशात काहीही चुकीचे नसल्याचे म्हटले आहे मात्र भारतीय संविधान अनुच्छेद–३३८ नुसार अनुसूचित जाती–जमातीच्या संरक्षक बाबीचे अनव्येक्षण आणि संनियंत्रण करण्याचे अधिकार अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे आहेत या आयोगाचे कामकाज राष्ट्रपती यांचे मार्फत चालतेआणि त्या अधिकारांचे हनन केले गेले आहे ही बाब सुप्रीम कोर्ट सांगण्यास कसे तयार होईल?



सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानुसार अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) मध्ये उपवर्गीकरण करण्यास परवानगी देण्यात आली आहे.या निर्णयाद्वारे या समाजातील अधिक मागासलेल्या जातींना आरक्षण देता येईल.सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की राज्यांनी मानके आणि डेटाच्या आधारे या उप–वर्गीकरणाचे समर्थन करावे असे म्हटले असले तरी जात निहाय जनगणना टाळून जाती–जमाती उप–वर्गीकरण करण्यावर राज्यातील राजकीय पक्ष आरक्षणात दुजाभावपूर्वक टक्केवारी ठरवतील यातून जाति–जातीत टक्केवारीसाठी संघर्ष पेटण्याचा धोका निर्माण झाला आहे.त्याचसाठी अनेक राज्यात जातीत उप–वर्गीकरण करण्याच्या हालचाली चालू झाल्या असून समीत्या स्थापण करण्यात आल्या आहे.समित्या देतील तो डेटा गृहीत धरून उप–वर्गीकरनात टक्केवाऱ्या देतील यातून अनुसूचित जातीच्या बहुसंख्याक जातीवर अन्याय होईल यातूनच यादव्याला सुरवात होईल यातूनच कांही राजकीय पक्ष मतांचा टक्का वाढवण्यासाठी कांही जातींना जास्तीच्या टक्क्याचे प्रलोभने दाखवून आकर्षित करीत आहेत.ही बाब लपून राहिलेली नाही

सरन्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड हे निकाल पत्रात नमूद करतात की,’राष्ट्रपतींनी अधिसूचित केलेल्या अनुसूचित जाती या एकसंघ नसून ’विजातीय वर्ग’ आहेत,असे प्रस्थापित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती–जमाती समुदायातील लोक पद्धतशीर भेदभावामुळे शिडी चढू शकत नाहीत. कलम १४ जातीच्या उप–वर्गीकरणाला परवानगी देते. हा वर्ग एकसंध आहे की नाही आणि कोणत्याही उद्देशाने एकत्रित न झालेल्या वर्गाचे आणखी वर्गीकरण करता येईल का हे न्यायालयाने तपासले पाहिजे’. असे म्हटले असले तरी अनुसूचित जाती या अनुक्रमित यादीचा उगम ब्रिटीश काळात १९३५ च्या कायद्याच्या भाग १४ अंतर्गत झाला होता तर अनुसूचित जमातीचा उगम ब्रिटिश काळात१९३१रोजीच्या जनगणने प्रमाणे झाला आहे.अनुसूचित जातींचा एक समूहगट म्हणून एकत्र बांधला होता या समूह गटात चातुर्वण्य वर्गाने बहिष्कृत केलेला उपवर्गांना एकत्रित एकसंघ बंधू ठेऊन सवर्णवर्गीयावर दबाव गट निर्माण करून अनुसूची निर्माण करून जाहीर केली जी भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर नंतर कायम ठेवली होती.सर्वोच्च न्यायालयाच्या अनुसूचित जाती–जमातीच्या उप–वर्गीकरण या निर्णयामुळे ब्रिटिशांनी तयार केलेली जाती–जमाती एकसंघ जातीसमूहाना विलग करून नव्या संघर्षाचा उगमस्थानाचा जन्म होत आहे.जाती–जमाती मधील टक्केवारीने विलग करून जाती–जमाती समूह गटाची ताकत क्षीण केली जात आहे.

आरक्षण एका पिढीपर्यंतच मर्यादित हवं.जर पहिल्या पिढीला आरक्षण दिलं तर दुसऱ्या पिढीला ते मिळू नये,असं मत न्या.मित्तल यांनी नोंदवलं.अस असलं तरी भारताला सामाजिक विषमतेचा मोठा इतिहास आहे.आमच्याच बांधवांना आम्ही जातींवरून पशूसारखी वागणूक दिली. दोन हजार वर्षे अनेक लोक गुलामीचे जीवन जगले. महाभारततही जातीपातीची उदाहरणे दिसतात. त्यामुळे ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना समान पातळीवर आणेपर्यंत आणि भेदभाव संपेपर्यंत आरक्षण सुरूच राहायला हवे.आरक्षण हा विषय आर्थिक समानता आणण्यापुरता मर्यादित नाही.सामाजिक समानता आणणे आवश्यक आहे.आजही समाजामध्ये अनेकदा जातीय भेदभावाच्या घटना घडतात.एका पिढी मर्यादेत आरक्षण असले पाहिजे.जोपर्यंत खालचा वर्ग वरी आणि वरचा वर्ग खाली गेल्या शिवाय आरक्षण थांबवता येणार नाही.असे जरी असले तरी आरक्षण संपवण्यासाठी सर्व बाजूनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षात एकमत झाले असून आरक्षणाविरोधात सर्वोच्च न्यायालयातून तोफा डागल्या जात आहेत.भांडवलदारांना आरक्षण अडसर वाटू लागले आहे.भांडवलदारांच्या दबाव भाजपा वर आहे,भाजपचा दबाव सुप्रीम कोर्टावर आहे.सुप्रीम कोर्टही होत्याचे नव्हते असे करत आहे.आरक्षण रडारवर आहे.त्याला काँग्रेसचा ही पाठींबा आहे.प्रकाश आंबेडकर आरक्षण वाचवण्याचा कसोटीने प्रयत्न करीत आहेत इतकेच नाही तर विधानसभा–२०२४ च्या निवडणुकीत आरक्षण हा कळीचा मुद्दा धरून आरक्षणवाद्यांना जागृत करीत आहेत.आरक्षण संपवायचे असेल तर भाजपा,काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना यांना मतदान करा.आरक्षण वाचवायचे असेल तर वंचित बहुजन आघाडी यांची ताकत वाढवा.

*************

शब्दांकन
एन.पी.सरवदे
९९७५४८४८८४

# भाजपने केजच्या जागेचा पुनर्विचार करून पप्पू कागदेंना उमेदवारी द्यावी अन्यथा जिल्ह्यात भाजपला धडा शिकवू ! केजच्या बैठकीत रिपाइं कार्यकर्त्यांचा एल्गार

नमिता मुंदडांना निवडणूक जड जाणार !:– मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यात आमदार मुंदडा यांची भूमिका रिपाइंचे विरोध यामुळे मुंदडा आणि भाजपला जड जाणार असल्याची लक्षणे दिसून येत आहेत.

कमळ हद्दपार करू कार्यकर्त्यांची भावना :– बैठकीला जमलेल्या कार्यकर्त्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भाजपा आणि जिल्ह्यातील नेतांचा निषेध व्यक्त करून कमळ हद्दपार करू अशा भावना व्यक्त केल्या

पप्पू कागदे आश्वासक चेहरा :– पप्पू कागदे हे जिल्ह्यातील सर्वसमावेशक आणि आश्वासक नेतृत्व असून ओपन, ओबीसी, दलीत, मुस्लिम प्रवर्गातील त्यांना मानणारा प्रचंड वर्ग आहे. त्याचा फायदा त्यांना मिळू शकतो.

भाजपने आम्हाला लोकसभा निवडणुकीच्या वेळी केजची जागा देण्याचे आश्वासन देवून ही आमच्या पाठीत खंजीर खुपसला. याचा बदला घेवून आम्ही मुंदडा यांना हद्दपार करू.

केज/प्रतिनिधी :– महायुतीने केजच्या जागे संदर्भात पुनर्विचार करून जागा रिपाइंचे नेते युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यात यावी. या मागणीसाठी रिपाइं कार्यकर्ते आक्रमक झाले असून जर पप्पू कागदे यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. तर भाजप आणि त्यांच्या उमेदवारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही. तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मुद्द्याला हरताळ फासणाऱ्या मुंदडा परिवाराला राजकारणातून हद्दपार करू. असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आणि भाजप आणि त्यांच्या नेत्या विरुद्ध प्रचंड आक्रोश व्यक्त केला आहे. केज विधान सभेसाठी रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा केलेली असताना देखील महायुतीने परस्पर उमेदवारी जाहीर करून मित्र पक्ष रिपांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा काम केले. या बाबत रिपाइं कार्यकर्त्यात प्रचंड प्रमाणात नाराजी आणि खदखद आहे. त्या निमित्त



भाजपने त्यांच्या निर्णयाचा फेर विचार करावा अशी भावना व्यक्त केली. तसेच जर भाजपने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. तर जिल्ह्यात कमळ फुलणार नाही आणि फुलू देणार नाही. अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

पप्पू कागदे हे जनमानसातील नेतृत्व असून तळागाळातील सामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी ते धावून जातात. त्यांच्या माध्यमातून जिल्हा आणि राज्यात रिपाइंचे प्रचंड मोठी ताकद निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या मोर्चे सभा आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, गायारान हक्क परिषद यांच्या माध्यमातून सर्व समाजाला आणि अठरा पगड जाती धर्माला न्याय देण्याचे काम करीत आहेत. पप्पू कागदे प्रामाणिकपणे काम गेल्या अनेक वर्षा पासून करीत आहेत. केज मतदार संघाचे सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची अनेक वर्षा पासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा असताना देखील त्यांना डावलले असल्याने मतदार संघात भाजप विरोधात लाट निर्माण झाली आहे. पप्पू कागदे यांच्या समर्थनार्थ केज रिपाइं कार्यकर्त्यांनी केज तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित केली होती. या बैठकीला मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, राजेश सोनवणे, राहूल सरवदे, विकास अरकडे निलेश ढोबळे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे यांच्यासह हरेंद्र तुपारे दादाराव धेंडे, गोरोबा बनसोडे, गोरोबा बनसोडे, सूरज काळे, सुरेश गायकवाड, रोहित बचुटे, विनोद शिंदे, शिवाजी बनसोडे, हरीश गायकवाड, विनोद गायकवाड, रघुनाथ ढालमारे, रोहित कांबळे, मधुकर तुपारे, काकासाहेब कांबळे यांच्यासह तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

दलितांच्या प्रश्नावर आमदारांची भुमिका काय ? :– तालुक्यातील दलितांचे स्मशानभूमीचे प्रश्न, गायारान आणि मराठा व ओबीसी आरक्षण या बाबत त्यांची स्पष्ट भूमिका नसल्याने याचा त्यांच्या मतदानावर परिणाम होवू शकतो.

## ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात लातूरच्या चन्नबसवेश्वर फार्मसीचे नेत्रदीपक यश



लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, सहयोग सेवाभावी संस्था, कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णूपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवात लातूरच्या चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या युवक महोत्सवात चन्नबसवेश्वर फार्मसीच्या २० विद्यार्थिनी आणि ५ विद्यार्थ्यांनी मिळून वक्तृत्व, वादविवाद, लावणी, आदिवासी नृत्य, मूक अभिनय, विडंबन, समूह गायन, सुगम गायन, कथाकथन, मेहंदी, रांगोळी, स्थळ छायाचित्रण अशा एकूण १३ कला प्रकारात यशस्वी सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आदिवासी नृत्यात द्वितीय पारितोषिक पटकावले. तर मूक अभिनयात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना प्रा. यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर , प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी एस. एम. , प्राचार्य डॉ. एस. एस. थोंटे यांसह सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## राजा नारायणलाल लाहोटी स्कूलच्या संघाची राष्ट्रीय समूह गायन स्पर्धेसाठी निवड

लातूर :– भारत विकास परिषद द्वारा आयोजित पश्चिम विभागीय राष्ट्रीय समूहगीत गायन स्पर्धेत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले असून या संघाची निवड १५ डिसेंबर २०२४ रोजी बेंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय समूह गायन स्पर्धेसाठी झाली आहे.

भारत विकास परिषद देवगिरी प्रांत धुळे शाखेच्या वतीने २९ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या प्रांतस्तरीय चेतना के स्वर समूह गायन स्पर्धेत राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलच्या संघाने प्रथम पारितोषिक मिळवले होते या स्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याने वडोदरा गुजरात येथे २० ऑक्टोबर २०२४ रोजी आयोजित पश्चिम विभागीय राष्ट्रीय समूहगीत गायन स्पर्धेसाठी स्कूलच्या एकमेव संघाची निवड देवगिरी प्रांतातून झाली होती.




विजेत्या संघामध्ये त्रिशा बाहेती, दिशा औटी, रिदम पाटील, आदिती थोरमोटे, पूर्वी शिंदे, मधुरा झंवर, दीक्षा धनमाने, उन्नती मुंढे. या स्पर्धकांचा समावेश आहे. या स्पर्धकांना श्री शिरीष देशपांडे,श्री तेजस , सौ.गीता मुंढे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष लक्ष्मी रमणजी लाहोटी ,श्री शैलेश जी लाहोटी सचिव ड. श्री आशिष वाजपेयी चेअरमन श्री आनंद लाहोटी प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलु रजिस्ट्रार श्री प्रवीण शिवनगीकर, समन्वयक मनोहर कबाडे, अरुण सेलवी, विनोद चव्हाण भारत विकास परिषद लातूर शाखा अध्यक्ष डॉ. विजय जाधव, सचिव सारंग अयाचित, देवगिरी प्रांत अध्यक्ष विश्वास लातूरकर, सचिव अमित कुलकर्णी, सौ. योगिता पत्की आदींनी कौतुक केले.

## काय आहे महिनाभराने शरीरावर कसा होईल परिणाम

जास्त प्रमाणात मीठ खाल्ल्याने आरोग्याला मोठी हानी होऊ शकते. अशा परिस्थितीत मर्यादित प्रमाणात सेवन करणे योग्य मानले जाते, पण महिनाभर मीठ खाणे बंद केले तर? एक महिन्यासाठी मीठ सोडण्याचे परिणाम अर्थात मीठमुक्त आहार करण्याचे परिणाम काय आहे ते आपण जाणून घेऊया. जास्त मीठ शरीरासाठी हानिकारक आहे, परंतु मीठ अजिबात न खाणे देखील अनेक प्रकारे हानिकारक असू शकते. तर, आज या कथेमध्ये आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की मीठ पूर्णपणे सोडून दिल्याने शरीरावर काय परिणाम होतो. या बदलांबद्दल जाणून घेऊया. डाएटिशियन वत्सल सेठने याबाबत अधिक माहिती दिली आहे. थकवा तुम्ही मीठ पूर्णपणे सोडून दिल्यास तुम्हाला थकवा जाणवू शकतो. वास्तविक, शरीरात मीठाच्या कमतरतेमुळे, शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडू शकते, ज्यामुळे व्यक्तीला सतत थकवा जाणवतो. शरीरात सोडियमची पातळी मर्यादित प्रमाणात असणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत मीठ अजिबात न खाल्ल्याने शरीरातील सोडियमची पातळी लक्षणीयरीत्या कमी होते, त्यामुळे चक्कर येणे आणि थकवा जाणवू शकतो. लो ब्लड प्रेशर महिनाभर मीठ पूर्णपणे न खाल्ल्याने तुमचा रक्तदाब कमी होऊ शकतो. वास्तविक, शरीरात सोडियमच्या कमतरतेमुळे वॉटर रिटेंशन होऊ शकते, ज्यामुळे रक्ताची पातळी कमी होऊ शकते. उलट्या आणि मळमळ यासारख्या समस्या देखील उद्भवू शकतात. त्यामुळे पूर्णतः मीठ सोडून देणं हे खरंतर योग्य नाही क्रॅम्प येणे मीठ पूर्णपणे बंद केल्यानेदेखील स्नायूंमध्ये क्रॅम्प येऊ शकतो. महिनाभर मीठ न खाल्ल्याने शरीरात सोडियमची कमतरता निर्माण होते आणि त्यामुळे रात्री झोपताना अचानक पायात



वा हातातून क्रॅम्प होऊ शकतात. मीठ हा आपल्या शरीराला आवश्यक असा घटक आहे. त्यामुळे तो पूर्णतः बंद करून चालणार नाही मीठ पूर्ण बंद करणे योग्य की अयोग्य? वर नमूद केलेल्या परिणामांवरून स्पष्टपणे दिसून येते की मीठ केवळ चवीसाठीच महत्त्वाचे नाही तर आरोग्यासाठीही महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत ते पूर्णपणे बंद करणे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे ते पूर्णपणे बंद करण्याऐवजी मर्यादित प्रमाणात खाणे चांगले. किती मीठ खावे? वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन नुसार, एखाद्या व्यक्तीने दररोज आपल्या आहारात फक्त ५ ग्रॅम मीठ समाविष्ट केले पाहिजे. जास्त मीठ सेवनामुळे हृदयरोग, जठरासंबंधी कर्करोग, लठ्ठपणा, ऑस्टिओपोरोसिस आणि किडनी रोग यासह अनेक गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. दिलेल्या सल्ल्यानुसार आणि डॉक्टरांशी सल्लामसलत करून मीठाचे सेवन करणे योग्य ठरू शकते.

## जगातील 'हा' देश झाला मलेरिया मुक्त, डासांवर नियंत्रण मिळवण्यासाठी फॉलो करा सोप्या टिप्स

वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे सगळीकडे मोठ्या प्रमाणावर रोगराई पसरते. रोगराई पसरल्यामुळे साथीचे आजार वाढू लागतात. यामध्ये दरवर्षी डेंग्यू, मलेरिया, कावीळ इत्यादी अनेक आजार वाढू लागतात. मलेरिया सारखा गंभीर आजार झाल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होऊन जाते. शरीरामध्ये सतत अशक्तपणा जाणवू लागतो. त्यामुळे सर्वच ऋतूंमध्ये आरोग्याची व्यवस्थित काळजी घ्यावी. मादी नोफिलीस डास चावल्यानंतर मलेरिया होतो. हा डास सगळ्यात आधी मलेरिया झालेल्या व्यक्तीला चावतो, त्यानंतर त्यांच्या शरीरातील जीव आपल्या शरीरात घेऊन निरोगी व्यक्तीला चावतो. यामुळे मलेरिया संसर्ग मोठ्या प्रमाणावर पसरतो. मलेरिया झाल्यानंतर योग्य वेळी उपचार न मिळाल्यामुळे रुग्णाचा मृत्यू होण्याची शक्यता असते. जगभरातील सर्वच देशांमध्ये मलेरियासह इतर सर्व साथीचे आजारांचे रुग्ण आहेत. त्यामुळे असा कोणताही देश नाही जिथे ,मलेरिया किंवा इतर आजारांचे रुग्ण नाहीत. सर्वच देशांमध्ये मलेरियाचे रुग्ण आहेत. पण जागतिक आरोग्य संघटनेने इजिप्तला मलेरिया मुक्त देश म्हणून घोषित केले आहे. इजिप्तच्या या ऐतिहासिक कामगिरीचे सर्वच देशांनी कौतुक केले आहे. इजिप्त मलेरिया मुक्त देश झाल्यामुळे सर्वच देशांना मोठा धक्का बसला आहे. भारताने इजिप्तकडून काय शिकावे? भारतासह इतर सर्वच देशांमध्ये मलेरियासह इतर सर्वच आजाराचे रुग्ण आहेत. ग्रामीण आणि आदिवासी भागात मोठ्या प्रमाणावर साथीच्या आजारांचा प्रसार होतो. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता नसल्यामुळे आणि योग्य त्या सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे मलेरिया सारखे गंभीर आजार पसरण्याची शक्यता असते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये मोठ्या प्रमाणावर डास, मच्छर येतात. त्यामुळे डास मुक्त होण्यासाठी औषधांची फवारणी करणे फार गरजेचे आहे. इजिप्तने कशा प्रकारे मिळवली डासांपासून मुक्ती: मलेरियापासून मुक्त मिळवण्यासाठी इजिप्तने काही धोरण आखली होती. त्या धोरणांनुसार मलेरियाचे निदान आणि उपचार, प्रशिक्षित आरोग्य तज्ञ आणि शेजारील देशांशी मजबूत भागीदारी करण्यात आली होती. त्यामुळे भारतासारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशात आरोग्य सेवा बळकट करून, प्रतिबंधात्मक उपायांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.





## भारतीय आहार हा एक परिपूर्ण आहार! डब्ल्यूडब्ल्यूएफचा अहवालात जगातील ठरली सर्वोत्तम अन्नप्रणाली

भारतीय आहार हा एक परिपूर्ण आहार! डब्ल्यूडब्ल्यूएफचा अहवालात जगातील ठरली सर्वोत्तम अन्नप्रणाली

नवी दिल्ली – जगभरात भारतीय पदार्थांची नावे आवर्जून घेतली जातात. कारण भारतीय आहार हा एक परिपूर्ण आहार मानतो जातो. आता वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचरने (डब्ल्यूडब्ल्यूएफ) जारी केलेल्या लिव्हिंग प्लॅनेटच्या २०२४ च्या अहवालामध्ये भारतीय अन्न व्यवस्था जगभरातील देशांपेक्षा पृथ्वीसाठी आणि पर्यावरणासाठी सर्वोत्तम अन्न व्यवस्था असल्याचं म्हटलं आहे.

या अहवालात भारतातील अन्न व्यवस्थेची प्रशंसा करण्यात आली आहे. जगभरातील देशांमध्ये भारताचा अन्न वापराचा नमुना सर्वात टिकाऊ आणि पर्यावरणास अनुकूल असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. तसेच जगभरातील सर्व देशांनी भारताचा हा पॅटर्न स्वीकारला तर २०५० पर्यंत पृथ्वीवरील होणारे नुकसान मोठ्या प्रमाणात कमी होतील, असेही अहवालात म्हटले आहे.

दरम्यान, भारतानंतर इंडोनेशिया, चीन, जपान आणि सौदी अरेबिया या देशांना सर्वोत्तम अन्नप्रणालींमध्ये स्थान देण्यात आले आहे. तसेच अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेतील आहार पद्धतींना सर्वात खराब दर्जा देण्यात आला आहे.

जगभरातील सर्व देशांनी भारतातील अन्न व्यवस्था किंवा खाद्यपदार्थ स्वीकारल्यास



२०५० पर्यंत आपल्या पृथ्वीवरील ८४ टक्के संसाधने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी असतील. याचा अर्थ १६ टक्के संसाधने वापरली जाणार नाहीत. त्यामुळे जागतिक तापमानवाढही कमी करण्यास मदत होईल आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत होईल.

तसेच १.५ओ डिग्री सेल्सियसपेक्षा खूपच कमी उष्णता उत्सर्जित होईल. त्यामुळे पर्यावरण सुधारेल, असेही या अहवालामध्ये म्हटले आहे.

रम्यान, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांच्या आहार पद्धतींना सर्वात वाईट मानांकन आले आहे. या देशांमध्ये चरबीयुक्त आणि साखरयुक्त पदार्थांच्या अतिसेवनामुळे लठ्ठपणाची समस्या वेगाने वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या अहवालात भारतातील लोकांच्या बाजरीचे सेवन करण्याच्या पद्धतीचाही उल्लेख करण्यात आला आहे. तसेच आरोग्यासाठी फायदेशीर असण्यासोबतच ते हवामानासाठीही चांगले असल्याचे अहवालात म्हटले आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा बाजरी उत्पादक देश असून जो जागतिक उत्पादनाच्या सुमारे ४१ टक्के आहे. बाजरीच्या वापराला चालना देण्यासाठी अनेक उपक्रम सुरु असल्याचे म्हटले आहे.

# शिक्षणस्फुर्ती सावित्रीबाई फुले युवती मंच व इंग्रजी अभ्यास मंडळाचे उद्घाटन

मुरुड/महेंद्र आल्टे : समाज जागृती शिक्षण संस्था संचलित, संभाजी कॉलेज मुरुड येथे दि.२२/१०/२०२४ रोजी शिक्षणस्फुर्ती सावित्रीबाई फुले युवती मंच व इंग्रजी अभ्यास मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख उद्घाटक म्हणून अम्रिता व्ही. बेलोकर (प्राचार्य, आचार्य विद्यासागर किड्स गार्डन, मुरुड) लाभल्या. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करत असताना बेलोकर म्हणाल्या, प्राप्त परिस्थितीत स्वतःला सिद्ध करून दाखवा व या परिस्थितीच खरी कसोटी लागते. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी शिक्षणस्फूर्ती सावित्रीबाई फुले व ज्योतिराव फुले यांच्या कार्याचे दाखले देऊन प्रेरित करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी भाषा सुधारण्यासाठी इंग्रजी भाषा ऐकणे व लिहिण्याची सवय जोपासावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. त्यांनी जीवनामध्ये कुठलीही गोष्ट अवघड नाही हे सांगताना महात्मा फुले यांच्या काळची परिस्थिती विद्यार्थ्यांसमोर मांडली त्या परिस्थितीमध्ये आणि आताच्या परिस्थितीमध्ये खूप फरक आहे याचा संदर्भ दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा ऐकायची व लिहायची सवय दृढ करावी जेणेकरून त्यांना त्या भाषेवर प्रभुत्व मिळवता येईल असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयीन विद्यार्थिनी कु. तब्बू पठाण हिने केले. पाहुण्यांचे प्रास्ताविक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मीना कदम यांनी केले तर इंग्रजी विभागाचे प्रास्ताविक प्रा. एम. बी. गायकवाड यांनी व कार्यक्रमाचे आभार महाविद्यालयीन विद्यार्थिनी कु. साखरे प्रिया हिने मानले. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. गोरे बी. एम. व प्रा. राहुल पवार यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमासाठी डॉ. एम. व्ही. चावरे, प्रा. शैलेंद्र सुतार, प्रा. अनुराधा सहालुगडे, प्रा. ऐश्वर्या गरड, प्रा. पिंजारी, प्रा. वारे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




## शिवसेनेच्या पहिल्या यादीत चूक; अंतिम यादी गुरूवारी देणार

मुंबई : विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचा नवा फॉर्म्युला समोर आला आहे. त्यात मविआतील ३ प्रमुख पक्ष काँग्रेस–शरद पवारांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना ८५–८५–८५ अशा जागा लढवणार आहे. २७० जागांवर तिन्ही पक्षात सहमती झाली असून उर्वरित १८ जागांबाबत मित्रपक्षांना सोडली जाईल. त्यांच्याशी उद्या सकाळपासून चर्चा होईल असं संजय राऊतांनी मविआच्या पत्रकार परिषदेत सांगितले. मात्र या पत्रकार परिषदेच्या काही मिनिटे आधी शिवसेना ठाकरे गटाकडून ६५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली, ती चुकून आल्याचे राऊतांनी म्हटले. संजय राऊत म्हणाले की, शिवसेना मुख्यालयाच्या यादीमध्ये काही दुरुस्त्या आहेत. ते कशाप्रकारे झाले, काय झाले, आमची प्रशासकीय चूक कशी काय होऊ शकली याबाबत आमचे अनिल देसाई आहेत ते या सर्व गोष्टी काळजीपूर्वक पाहतात. पण उद्या आम्ही उद्या बसणार आहोत. त्यावर काही नव्याने चर्चा होतील असे त्यांनी सांगितले. शिवसेनेच्या पहिल्या यादीत मित्रपक्षांच्या जागांचाही समावेश आहे. त्यामुळे पहिल्या यादीतील काही उमेदवार बदलले जाऊ शकतात असे संकेत राऊतांनी दिले आहेत. तसेच २८८ जागांचा प्रश्न सुटला असे जेव्हा आम्ही सांगतोय, ते अत्यंत जबाबदारीने सांगतोय. १८ जागा मित्रपक्षाला दिल्या जातील.



# उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे सादर करताना दिशानिर्देशांचे पालन करणे आवश्यक

लातूर, दि. २३ : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी निवडणूकीची सूचना प्रसिध्द झालेली आहे. लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात नामनिर्देशनपत्रांची वितरण व्यवस्था सकाळी ११ ते ३ या वेळेत मदत कक्ष, पहिला मजला, तहसील कार्यालय, लातूर येथे करण्यात आलेली आहे. उमेदवारांना किंवा त्यांच्या सूचकाला नामनिर्देशनपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मंगळवार, २९ ऑक्टोबर, २०२४ पर्यंत सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त दुपारी ३ वाजेपर्यंत कोर्ट हॉल पहिला मजला, तहसील कार्यालय, लातूर येथे दाखल करता येतील.२३ ऑक्टोबर, २०२४ रोजी लातूर शहर विधानसभा मतदारसंघातंर्गत एकूण २२ नामनिर्देशनपत्रे वितरीत करण्यात आली आहे. आजपर्यंत एकूण १०७ नामनिर्देशनपत्रांचे वितरण झाले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्राप्त नामनिर्देशनपत्रांची संख्या निरंक आहे. उमेदवार किंवा सूचक यांनी नामनिर्देशपत्र सादर करतांना दिशानिर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे.नामनिर्देशपत्र दाखल करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कक्षात उमेदवार व इतर ४ अशा एकूण ५ व्यक्तींनाच प्रवेश करता येईल. ५ पेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश मिळणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे १०० मीटर परिसरात उमेदवारास फक्त ३ वाहनासह निवडणूक नियमाचे पालन करुन प्रवेश करता येईल . निवडणूक लडविणाऱ्या उमेदवारांना ४ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी ३ नंतर चिन्हांचे वाटप करण्यात येईल. राष्ट्रीय व राज्य स्तरावरील मान्यताप्राप्त पक्षाचे अधिकृत उमेदवारास पक्षाचे राखीव असलेले चिन्ह देण्यात येईल व इतर उमेदवारास प्रथम नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या पसंती क्रमानुसार व उपलब्धतेनुसार मुक्त चिन्हांमधून चिन्ह वाटप करण्यात येईल. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीसाठी मान्यताप्राप्त राष्ट्रीय, राजकीय पक्षाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारासाठी १ प्रस्तावक व नोंदणीकृत अमान्यता प्राप्त राजकीय पक्ष व इतर अपक्ष उमेदवारासाठी १० मतदार प्रस्तावक लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील असणे आवश्यक आहेत . नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने १० हजार रुपये तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील मागासवर्गीय उमेदवार यांनी ५ हजार रुपये अनामत रक्कम भरुन त्याची पावती नामनिर्देशपत्रासोबत जोडणे आवश्यक आहे. उमेवाराने निवडणूक खर्चासाठी, बँकेत निवडणूकीसाठी नवीन स्वतंत्र खाते उघडणे आवश्यक आहे. निवडणूक खर्चासाठीचा बँक खात्याच्या पासबुकची छायांकित प्रत नामनिर्देशपत्र सादर करतेवेळी कळविणे आवश्यक आहे, असे लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे यांनी कळविले आहे.

# विधानसभा निवडणुकी करिता केज तालुका शिवसेना सज्ज..!

### उद्धवजी ठाकरे साहेब यांना मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांचा निर्धार..!



केज/प्रतिनिधी :– शिवसेना–उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, मराठावाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमा ताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे ,शिवसेना सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या उपस्थितीत येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक २३ ऑक्टोंबर २०२४ रोजी केज शिवसेना संपर्क कार्यालय येथे केज तालुका शिवसेना पदाधिकार्यांची व बुथप्रमुखांची महत्वपूर्ण बैठक तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या आयोजनात संपन्न झाली. यावेळी उपस्थित उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, तालुकाप्रमुख अशोक जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सोमनाथ गित्ते, जिल्हा समन्वय अनिल देशमुख,जिल्हासचिव रोहित कसबे,जिल्हासहसंघटक दिलीप जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे, युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले, तालुका सचिव सखाराम वायबसे,तालुकासंघटक सुधिर जाधव,लक्ष्मण गलांडे, उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,सुरज वाघमारे,शहरसचिव जाहेद शेख, उपशहरप्रमुख पप्पू ढगे,पप्पू कोल्हे, युवासेना शहरप्रमुख अनिकेत गायकवाड, उपतालुकाप्रमुख दिलीप गालफाडे, अश्रफ शेख, दत्ता तांदळे,शहदेव भोसले, ज्ञानेश्वर बोबडे, रामभाऊ पवार, दिलीप खाडे, गणेश निंगुळे, बाळासाहेब कसबे,राजाभाऊ मोटे,विनायक वनवे, आप्पा कांबळे, मधुकर अंधारे,हरिष गिते, अमोल घुले, गोकुळ मोरे,आतम घाडगे, वैजनाथ वाघमारे, शिवाजी इंगळे, बहादुर शेख, राहुल फुके,राम इंगळे,अगंद देशमुख,सह शिवसैनिक उपस्थित होते.

# अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष जाणते राजे शरदचंद्रजी पवार यांनी निष्ठावंत कार्यकर्त्याला दिला न्याय

### केज विधानसभेची उमेदवारी मा. आमदार पृथ्वीराज साठे यांना जाहीर होताच कार्यकर्त्यात जल्लोष,पेढे वाटून केला आनंद साजरा

केज / प्रतिनिधी :– अखेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष जाणते राजे शरदचंद्रजी पवार यांनी निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय दिला असून केज विधानसभेची उमेदवारी मा. आमदार पृथ्वीराज साठे यांना जाहीर होताच कार्यकर्त्यात जल्लोष, गुलालाची उधळण करत फटाक्याचे आतषबाजी करून पेढे वाटून आनंद साजरा केला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, गेल्या दोन ते तीन महिन्यापासून विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारीसाठी केज विधानसभेतून अनेक इच्छुक हे इतर पक्षाला सोडचिठ्ठी देऊन उमेदवारीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी गटाकडे उमेदवारी मागत होते परंतु शरद पवार गटाचे एकनिष्ठ मा. आमदार पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी देऊन शरद पवार साहेब यांनी एकनिष्ठ कार्यकर्त्यांना खरा न्याय दिला आहे असे मतदारातून व कार्यकर्त्यातून बोलले जात आहे. गेल्या कित्येक दिवसापासून केज मतदार संघात डॉ. अंजलीताई घाडगे, मा. आमदार संगीताताई ठोंबरे ,रमेश तात्या गालफाडे, असे असंख्य उमेदवार उमेदवारीसाठी शरद पवार गटाकडे ठाण मांडून होते परंतु शरद पवार गटाकडून पृथ्वीराज साठे यांना उमेदवारी जाहीर होताच कार्यकर्त्यातून मोठा जल्लोष साजरा केला जात आहे. तर काही ठिकाणी गुलालाची उधळण करून फटाक्याची आतषबाजी करत पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहावयास मिळत होते. केज शहर मतदार संघामध्ये ठिकठिकाणी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांचे कार्यकर्त्यांनी स्वागत केले तसेच साठे यांना उमेदवारी मिळाली म्हणून त्यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत असल्याचे चित्र केज विधानसभा मतदार संघामध्ये पाहण्यास मिळत आहे.



## विद्यार्थ्यांनी संशोधनातून स्टार्टअपची सुरुवात करावी

परभणी : जगभरात रोज नवनवीन शोध लागत आहेत. अशा शोधांच्या बळावर जग झपाटाने बदलत आहे. काळाची गरज लक्षात घेता विद्यार्थ्यांचे संशोधन स्पर्धेपुरते मर्यादित न राहता अविष्कार सारख्या संशोधन महोत्सवातून स्टार्टअपची सुरुवात व्हावी असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि येथील श्री शिवाजी महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने दि.२२ रोजी परभणी येथे आयोजित विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सव अविष्कार–२५ च्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

# कर वसुलीची मनपाची मोहीम सुरूच, थकबाकीदारानी टैक्स भरणा करुन कार्यवाही टाळावी - मनपा आयुक्त. बाबासाहेब मनोहरे

### ३५ लाख थकीत करासाठी २ भुखंड जप्त

लातूर/प्रतिनिधी: थकित कर वसुलीसाठी लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने वसुली मोहीम राबविण्यात येत असून वारंवार नोटीसा देऊनही कर भरणा करण्यात येत नसल्याने जप्ती केली जात आहे.अशाच कारवाईत बुधवारी (दि.२३) दोन भूखंड जप्त करण्यात आले.एका वसतिगृहाच्या कार्यालयाला व ३ गाळ्यांना सील ठोकण्यासह ३ नळ जोडण्या खंडित करण्याची कारवाई करण्यात आली. शहरातील ए झोनमध्ये दोन खुल्या भूखंडांवर २५ लाख ३५ हजार ३७८ रुपयांचा मालमत्ता कर थकलेला होता.पालिकेने ते दोन्ही भूखंड जप्त करून त्यावर मनपाच्या मालकीचा फलक लावला.सी झोनमध्ये एका वसतिगृहाकडे ३ लाख ३१ हजार ६९२ रुपये कर थकित होता.तो न भरल्यामुळे वसतिगृहाच्या कार्यालयाला सील ठोकण्यात आले.४ लाख ८ हजार ८६२ रुपयांचा थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या वसुलीसाठी ३ नळ जोडण्याही तोडण्यात आल्या.डी झोनमध्ये ३ गाळेधारकांकडे २ लाख २६ हजार ७२६ रुपये मालमत्ता कर थकीत होता.त्यामुळे ते तीनही गाळे सील करण्यात आले.आणखी एका गाळेधारकाकडे २९ हजार २९९ रुपयांचा मालमत्ता कर थकित होता. पालिकेने हा गाळा सील करताच संबंधितांनी थकीत रकमेचा धनादेश मनपाकडे सुपूर्द केला. थकीत कराच्या वसुलीसाठी मनपाकडून मोहीम राबविण्यात येत आहे.ही मोहीम अधिक तीव्र केली जाणार आहे. त्यामुळे जप्तीसारखी कटू कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी आपल्याकडील कर भरून मनपाला सहकार्य करावे,असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.



# गणपतराव देशमुख यांच्या चित्रपटांमध्ये अहमद देशमुख साकारणार महत्त्वाची भूमिका २५ ऑक्टोबरला रिलीज होणार चित्रपट.

लातूर ( प्रतिनिधी) : –देशमुख या नावाला फार जुना,पारंपरिक, कर्तृत्ववान वारसा व वलय आहे.देश म्हणजे क्षेत्र–विभाग आणि मुख म्हणजे चेहरा–ओळख.लातूरकडील देशमुख म्हणजे रुबाब, रुतबा आणि नावाला शोभेसे कर्तुक.राजकारण आणि कलाक्षेत्रात देशमुख हे नाव फार फार–आदराने घेतले जाते कारण विलासरावजी देशमुख असोत की रितेश देशमुख असो यांनी आपापल्या क्षेत्रात जपलेला सभ्यपणा लातूरला आणि महाराष्ट्राला देशविदेशात नावाजून गेला.. रितेश देशमुख यांच्यामुळे लातूरमध्ये कला खूपच जोपासली व फोफावत चालली आहे.सगळ्या महाराष्ट्र लातूरकडे आशेने व आदराने बघत आहे. आणि लातूरकर या विश्वासावर खरे उतरतील कारण लातूरचाच आणखी एक देशमुख चित्रपट श्रृष्टीत हळूहळू आपली मुळे दमदारपणे पसरवत आहे.अहमद देशमुख ... नाम तो सुना ही होगा.तोच अहमद देशमुख ज्याने ढिशक्याव सारख्या मराठी चित्रपटाची निर्मिती करत अभिनय क्षेत्रात भीमपाऊल टाकले आणि चित्रपट सृष्टी व महाराष्ट्राचे लक्ष कला क्षेत्रातील लातूरच्या खाणीकडे आकषत झाले.कौतुकाची व अभिमानाची ही गोष्ट होती की चित्रपट निर्माता असूनही अहमदने स्वतःला फालतू अहंकारात अडकू न देता तो अन्य प्रोडक्शनसाठी लिनतेने ऑडिशन देत होता.परिमाणतः त्याने अभिनय केलेला दुसरा चित्रपट आला आल्याड पल्याड.आल्याड पल्याड ने कमाल केली. सलग महिनाभर रजत पडदा सोडला नाही. अहमदचा अभिनय जाणकारांच्या नजरेत भरला आणि निर्माता–अभिनेता या ओळखीतून अभिनेता स्वावलंबी झाला. अहमद फार लवकरच पुढील टप्प्यात पोहचला. या पोहचण्यात घाई नव्हती तर गती होती. अहमदचा आणखी एक मराठी/ हिंदी चित्रपट आणि या चित्रपटाचे डारेक्टर अल्ताफ शेख हे आहेत.कर्मयोगी आबासाहेब २५ ऑक्टोबरला जगभर प्रदर्शित होतोय. स्वगय मा. आमदार गणपतराव देशमुख यांच्या विश्वासू साथीदाराच्या भूमिकेत तो आपल्या समोर येतोय. जी भूमिका करण्यासाठी कित्येक बड्या व नामांकित अभिनेत्यांनी लेखक/ दिग्दर्शकाला सकाळी,दुपारी, संध्याकाळी, रात्री मेसेजचे रतीब मोबाईलवर घातले होते ती भूमिका अहमदला मिळावी ही लातूरच्या कष्टाळू मातीचा आणि देशमुख या आडनाव साधर्म्यचा अनोखा संयोग म्हणावा लागेल. अहमदचे आणखी काही चित्रपट कलाकार व निर्माता म्हणून लवकरच महाराष्ट्राच्या सजग व चोखंदळ प्रेक्षकांना बघायला मिळणार आहेत.रितेश देशमुख यांच्या नंतर अहमद देशमुख यांच्याकडे महाराष्ट्राच्या व देशाचे लक्ष असणार हे नक्की.अहमद देशमुख यांना त्यांच्या कष्टासाठी खूप खूप शुभेच्छा.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE